# नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे राष्ट्रीय परिषद



। सिडको । वार्ताहर ।

नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये ग्लोबलायझेशन आणि आव्हाने या विषयांवर राष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली. परिषदेच्या उद्घाटनाला डॉ.इ.बी. खेडकर (व्हा.चान्सलर अजिंक्य डी. वाय.पाटील, पुणे) तसेच डॉ. व्ही. एस. मोरे (सिनीअर डायरेक्टर, एम.जी. व्ही. पंचवटी, नाशिक) संतोष मंडलेचा (सिनीयर व्हा. प्रेसिडेन्ट ऑफ महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर, नाशिक) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

चाळीस विविध रिसर्च पेपर आणि शोध निबंध परिषदेमध्ये सादर करण्यात आले. ह्या प्रसंगी ग्लोबलायझेशन व त्या बरोबर येणाऱ्या आव्हानांना समर्थपणे पेलण्याचे मंत्र डॉ.इ.बी.खेडकर यांनी दिले. तसेच भारतीय संस्कृती आणि आपले स्वत्व न सोडण्याचा सल्ला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाष देशमुख यांनी दिला.

डॉ. व्ही.एस. मोरे यांनी सर्व प्रकारच्या आव्हानांना अभ्यासपुर्वक सामना करावा असे प्रतिपादन केले. परिषदेमध्ये तज्ज्ञ म्हणून आंतरराष्ट्रीय ख्यातीचे हृदयविकार तज्ज्ञ डॉ.शीतलकुमार हिरण उपस्थित होते. त्यांनी स्ट्रेस मॅनेजमेंट आणि ग्लोबलायझेशन या विषयी उपस्थितांचे उद्बोधन केले. नवजीवनचे माजी विद्यार्थी आणि पीडीलाईट कंपनीचे रिजनल मॅनेजर श्री.मंदार कुलकर्णी यांनी सप्लाय चेन आणि ग्लोबलायझेशन या विषयावर उहापोह केला. उद्योजिका दीपाली चांडक यांनी ग्लोबलायझेशन आणि उद्योजकता या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये निवड पेपर्स आय.एस.बी.एन नंबर असलेल्या पुस्तक रुपाने प्रकाशित करण्यात येत आहे. भरघोस प्रतिसाद मिळालेल्या या परिषदेच्या रुपाने 'ग्लोबलायझेशन आणि आव्हाने' या विषयावर विद्यार्थी आणि संशोधक यांना मोलाचे मार्गदर्शन मिळाले. सर्व मान्यवरांनी नवजीवनने असेच विविध उपक्रम राबवून समाजात वेगळे स्थान निर्माण करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

**Gavkari 28th March 2017**